# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 08.09.2025** **वार-सोमवार**

---

**पुणे म्हाडा**

केंद्र सरकारच्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यात सुमारे 35 हजार घरं बांधण्याचं उद्दिष्ट आहे. यापैकी 13 हजार 301 घरं बांधण्याचं नियोजन पुणे  म्हाडानं केलं आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या शहरी भागांबरोबरच आता पुणे जिल्ह्याच्या निमशहरी भागातही परवडणारी घरं उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडाने पुढाकार घेतला आहे. त्या अंतर्गत रोहकल आणि नेरे इथल्या प्रकल्पांतून साधारण 13 हजार घरांची निर्मिती केली जाणार आहे. त्यातील काही घरं गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राखीव असतील.

रोहकलमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी समाजाचं वास्तव्य आहे. या समाजासाठी काही भाग राखीव ठेवण्याची विनंती उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आली होती. त्यामुळे प्रकल्पात त्यांच्या पुनर्वसनासाठी जागा

राखीव ठेवली जाणार असल्याचं पुणे विभागाचे सभापती शिवाजीराव आढळराव यांनी सांगितलं.

**<u>एनएचएमसंप</u>**

राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील म्हणजे एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप सलग 21व्या दिवशी सुरू आहे. याचा परिणाम ग्रामीण भागातील आरोग्य सेवांवर होत असून, क्षयरोग निदान, पोषण पुनर्वसन केंद्र आणि प्रामुख्यानं नवजात शिशू काळजी विभागासारख्या महत्त्वाच्या सेवांना फटका बसत आहे. राज्यातील 60 विशेष नवजात शिशू काळजी विभागांपैकी 41 विभागांमधील कर्मचारी संपावर आहेत. दरम्यान एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत प्रशासनानं समाधानकारक आणि कालबद्ध कार्यक्रम जाहीर केल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असं आंदोलनाचे राज्य समन्वयक विजय गायकवाड यांनी सांगितलं आहे.

**<u>ईद मिरवणूक</u>**

हजरत महंमद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यात मिरवणूक काढण्यात आली. यंदाचं वर्ष हे महंमद पैगंबर यांचं दीड हजारावं जयंती वर्ष असल्यामुळे अधिक उत्साहाने मुस्लिम बांधव

यामध्ये सहभागी झाले होते. सिरत कमिटीच्या वतीने आयोजित या डीजेविरहीत मिरवणुकीचं विविध पक्ष संघटना आणि स्वयंसेवी संस्थांच्या वतीनं ठिकठिकाणी स्वागत करण्यात आलं.

**<u>सुनावणी</u>**

आगामी निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या पुणे महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेवर सुमारे 6 हजार हरकती- सूचना नोंदविण्यात आल्या आहेत. येत्या 11 आणि 12 सप्टेंबर रोजी यावर सुनावणी होणार आहे.

**<u>Pcmc</u>**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे रीड्यूस – रीयुज – रिसायकल केंद्र चालवली जातता. विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उभारण्यात आलेल्या या केंद्रांद्वारे नागरिकांकडून वापरण्यायोग्य वस्तू संकलित करून त्या थेट गरजूंपर्यंत पोहोचवल्या जातात. या उपक्रमामुळे शहरातील कचऱ्याचं प्रमाण कमी होत असून समाजातील गरजूंना उपयुक्त वस्तू उपलब्ध होत आहेत. या उपक्रमासाठी शैक्षणिक साहित्य, कपडे, खेळणी तसंच

घरगुती वापराचं साहित्य, इलेक्ट्रॉनिक साहित्य केंद्रांवर जमा करण्याचं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**<u>पदवीधर</u>**

पुढच्या वर्षी होणाऱ्या विधान परिषदेच्या पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भाजपाकडून प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांची ‘मतदार नोंदणी प्रमुख’ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केलं.

**<u>सीए</u>**

प्राप्तीकर विवरणपत्र आणि टॅक्स ऑडिट रिपोर्ट सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी पिंपरी-चिंचवड भाजपाच्या सनदी लेखापाल विभागानं केंद्र सरकारकडे केली आहे. करदात्यांची वाढती संख्या, पोर्टलवरील तांत्रिक अडचणी, तसंच पावसामुळे विस्कळीत झालेलं कामकाज, या पार्श्वभूमीवर ही मुदतवाढ अत्यावश्यक असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे. प्राप्तीकर विवरणपत्र दाखल करण्याची अंतिम तारीख 15 सप्टेंबर आहे; तर

टॅक्स ऑडिट रिपोर्ट सादर करण्यासाठी 30 सप्टेंबर ही अंतिम मुदत आहे.

**<u>पुरस्कार घोषणा</u>**

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली. डिंपल प्रकाशनचे अशोक मुळे यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर बालसाहित्यकार, आणि साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ल. म. कडू यांना साहित्यसेवा कृतज्ञता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीव बर्वे आणि प्रमुख कार्यवाह पराग लोणकर यांनी निवेदनाद्वारे आज ही घोषणा केली.

**<u>पत्रकार अध्यक्ष</u>**

पुणे पत्रकार प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार शैलेश काळे यांची फेरनिवड करण्यात आली आहे. कार्यवाहपदी पांडुरंग सांडभोर आणि खजिनदारपदी सुनीत भावे यांची निवड करण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज समिश्र वातावरण होतं. आज कमाल तापमान 27 तर किमान तापमान 19 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, तसंच हलक्या पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता,  ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**